पुणे सत्ता

पुणे, शुक्रवार, दि. १० जुलै २०२६

# फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे 'माऊली-एक कालातीत परंपरा' भरतनाट्यम कार्यक्रम १२ जुलै रोजी

- आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नृत्यांगणा कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांची प्रस्तूती

**पुणे :** भक्ती, परंपरा, कला व ईश्वर यांच्यातील कालातीत संबंधाचा उत्सव म्हणजे ' माऊली-एक कालातीत परंपरा' आहे. पंढरपूर वारीचा आत्मा जिवंत करणारी ही कला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम् कलाकार, नृत्यदिग्दर्शक आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या भरतनाट्यमचा कार्यक्रम पुणेकरांना अनुभवता येणार आहे. हा कार्यक्रम रविवार दि.१२ जुलै रोजी कोथरुड, मयूर कॉलनी येथील एमईएस सभागृहात सायंकाळी ५ ते ६.१५ वाजेपर्यंत होणार आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नृत्यांगणा, भरतनाट्यम कलाकार, नृत्यदिग्दर्शक आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर, फ्युएल च्या विभागप्रमुख प्रा. प्राची अहिरराव आणि श्री. चंद्रशेखर उपस्थित होते.